सहज राजयोग आणि माहिती तंत्रज्ञान - भाग 1

# सुनते रहो ! मुस्कराते रहो !! - एफ एम रेडिओ मधुबन

ब्र.कु.प्रा.डॉ.सोमनाथ वडनेरे, जळगाव

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय गेल्या 75 वर्षापासून अखंडपणे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे.यात पथ चित्र प्रदर्शनी मौखिकरित्या समजविण्यापासून सेवेस सुरुवात करणा-या या विद्यालयाद्वारे आज माहिती आणि तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक साधनामार्फत जनसामान्यांपर्यंत सहज राजयोग शिक्षण पोहचत आहे. यात ओमशांती रेडिओ, पीस ऑफ माईंड टिव्ही वाहिनी, विविध संकेत स्थळे, वेब ब्लॉग, कम्युनिटी, सोशल नेटवर्किंग, ॲनिमेशनपट आदिंचा समावेश आहे. अमृतकुंभच्या वाचकांना यासर्वांची ओळख व्हावी याच निखळ उद्देशासाठी या स्तंभाची क्रमशः सुरुवात करीत आहोत. स्तंभलेखक हे या क्षेत्रातील तज्ज्ञ असून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात न्यू मीडिया टेक्नॉलॉजी या विषयाचे सहा.प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ब्रह्माकुमारीज् प्रथम हिंदी वेबसाईट www.bkvarta.com व www.mediainitiative.org चे सस्थापकही ते आहेत. - संपादक

अहमदाबादचे महेसाणा रेल्वे स्टेशन आल्यावर सहज एफएम रेडिओ सुरू केला तर आपले "सुनते रहो ! मुस्कारते रहो !! " या मधूर घोषवाक्याने स्वागत होते. ब्रह्माकुमारीज् इन्फार्मेशन आणि कम्युनिकेशन विभागातर्फे 90.4 रेंजवर रेडिओ मधुबन नुकतेच सुरु झालेले आहे. मनोरंजन क्षेत्रात रेडिओ या माध्यमानंतर टीव्ही, वेब, ब्लॉग्स् आदि माध्यमे आलीत परंतु आजही पारंपारिक संदेशवहनाचे माध्यम म्हणून रेडिओकडे पाहिले जाते. नेदरलॅण्डस मध्ये 1919 यावर्षी जगातील पहिले एफएमफ रेडिओ प्रक्षेपण झाल्याची नोंद आहे. भारतात 1927 मध्ये एफएम प्रक्षेपण झाले. पारंपारिक रेडिओ पेक्षा एफएम अतिशय लोकप्रिय झाले. याचे कारण पारंपारिक पद्धतीचे कार्यक्रमांऐवजी आधुनिक काळाशी सुसंगत तसेच तरुणाई ला भावणारे प्रक्षेपण होय. दुर्गम इलाक्यात, देशाच्या सीमेवर लष्करी जवानांसाठी तर रेडिओ पेक्षा दुसरे कोणतेही मनोरंजनाचे माध्यम नसते. रेडिओ मधुबन कुठल्याही एफएम सुविधा असलेल्या रेडिओ हॅण्डसेटवर 90.4 रेंजवर लागते. आजकाल युवकांमध्ये मोबाईल मध्ये एफएम रेडिओ ऐकण्याची जबरदस्त आवड व आकर्षण निर्माण झालेले आहे. रेडिओ मधुबन आपण मोबाईल मध्येही ऐकू शकतात. संगणकावर काम करीत असतांना वेबसाईडस् वरील संगीत ऐकणे ही आजच्या आधुनिक काळातील आवड आहे, ही आवड लक्षात घेता रेडिओ मधुबन ऑनलाईन ऐकण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे. सदर सुविधा http://radiomadhuban.in या संकेतस्थळ (वेबसाईट)वर उपलब्ध झालेली आहे. ज्यांना बेबवरील संगीत ऐकण्याची आवड आहे त्यांच्यासाठी जणू ही पर्वणीच ठरली आहे.

एफएम मध्ये केवळ पॉप, रॉक, कर्णकर्कश गाणे असतात असा एकूणच नकारात्मक सूर सर्वसामान्यांचा आहे. सदर समज खोटा ठरविण्याची ताकद 'एफएम रेडिओ मधूबन' मध्ये आहे. यामुळे नाविण्यपूर्ण वैशिष्ट्यांनी अल्पावधीतच जनसामान्यांमध्ये लोकप्रियतेचे शिखर गाठले गेले.

आध्यात्मिक पातळीवर मूल्यसंवर्धनाचे प्रमुख उद्दिष्ठ असलेल्या रेडिओ मधुबन मध्ये मनोरंजनाबरोबर अनेक माहितीपूर्ण कार्यक्रमांचेही प्रक्षेपण केले जाते. यात पुढील कार्यक्रमांचा समावेश आहे.

* विविध प्रकारची प्रेरणादाई आध्यात्मिक गीते.
* प्रत्येक विशेष दिवसानिमित्त त्या दिवसांचे महत्व, ठराविक क्षेत्रातील विशेष तज्ज्ञ व्यक्तिंच्या मुलाखती.
* माऊंट आबू कार्यक्षेत्रात होणारे संमेलने, चर्चासत्राचे थेट प्रक्षेपण.
* ब्रह्माकुमारीज्च्या विविध ठिकाणच्या कार्यक्रमांचे ध्वनीमुद्रित प्रक्षेपण.(रेडिओ वृत्तांत)
* वैद्यकिय, जाणीव जागृतीसाठी डॉक्टरांच्या विशेष मुलाखती.
* ग्लोबल हॉस्पिटल आणि यासारंख्या उपक्रमाद्वारे दिल्या जाणा-या वैद्यकिय सेवांची माहिती

**रेडिओ मधुबन वरुन प्रक्षेपित कार्यक्रमांचे प्रकार**

सकाळी 6 वाजेपासून सुरु होणारे हे रेडिओ चॅनल रात्री 10 वाजेपर्यंत चालते. त्यात पुढील विविध कार्यक्रमांचा समावेश आहे.

**सकाळी 6 ते 7 : सुप्रभात** - या कार्यक्रमात 'आजचा सुविचार' सदरात एक सुविचार दिला जातो. त्याच प्रमाणे काही सकारात्मक विचारपुष्पही सादर केली जातात त्यात विविध आध्यात्मिक नेत्यांचे विचार असतात.

**सकाळी 7 ते 10 : नई किरण** - या कार्यक्रमात 'तत्व बोध' हे सदर असते. यात एखादी जातक कथा (बोध कथा) सांगितली जाते ज्या योगे एखादी शिकवण श्रोत्यांना मिळते. या सदरातच आजच्या दिवसाच्या बातम्यांचे शीर्षक (हेडलाईन्स) सादर केल्या जातात. याबरोबरच आरोग्य रक्षणाचे कार्यक्रम, स्वास्थ्य, सुरक्षा आदि बाबतची महत्वपूर्ण माहिती सादर केली जाते. विविध शासकीय योजनांची माहिती, लोकांमध्ये जाणीव जागृती होईल अशी माहिती, कायद्याची ओळख आदि सुद्धा सादर केल्या जातात. याच कालावधीत सोन्या/चांदीचे भाव, जागतिक घडामोडी, पर्यावरणासंबधी जागृती कार्यक्रम, पर्यावरण तज्ज्ञांच्या मुलाखती, पर्यावरण रक्षणासाठी काही जजूबी गोष्टी ज्या आपण सहज करु शकतो, आजच्या दिवसाचे महत्व, ऐसिहासिक दृष्टीने आजच्या मागील काही वर्षातील दिवसाचे महत्व इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे.

**सकाळी 10 ते 1 : आशियाना** - या सत्रात आरोग्य, सौंदर्य, महिला सशक्तिकरणासंदर्भातील कायदेशीर बाजू, महिलांचे मुलभूत अधिकार, विविध पाकक्रीया, कुटुंब व्यवस्थापन, आजीबाईचा बटवा (घरगुती उपचार), तनाव मुक्ति, बाल मानसशास्त्र, कृषि, पौष्टिक अन्नासंदर्भातील महत्वाच्या बाबी आदिंचा समावेश आहे.

**दुपारी 1 ते 4 : उडान** - दुपारच्या सत्रात रोजगाराच्या संधी, जातक कथा, कोडे आणि बौद्धिके, व्यक्तित्व विकास, विनोद, श्रोत्यांकडून आलेले एसएमएस, विज्ञानाचे शोध, विश्वात घडणा-या अद्भूत घटना, श्रोत्यांकडून आलेले फोन आदिंचा समावेश आहे.

**दुपारी 4 ते 7 : जिओ जिंदगी** - बातम्या, ठळक घडामोडी, प्राचिन लेखकांच्या कथा, शोध, विश्व विक्रमांचा आढावा, क्रीडा विषयक ताज्या घडमोडी, यशस्वी व्यक्तिंच्या यशोगाथा, वाहन व्यवस्थापन (दुरुस्ती व देखभाल) तत्वज्ञान, जगातील महत्वाच्या ठिकाणांची माहिती, वाक्यप्रचार / म्हणींचा अर्थ आदि कार्यक्रमांचे प्रक्षेपण केले जाते.

**संध्याकाळी 7 ते 10 : खुशी के नगमे** - रात्रीच्या अंतिम सत्रात मूल्य शिक्षण, मधूर स्वप्नांसाठी संदेश, कविता, शायरी इत्यादींच्या समावेश आहे.

माहिती, शिक्षण आणि मनोरंजन या त्रिसूत्रीवर आधारित विविध लोकोपयोगी कार्यक्रम रेडिओ मधूबन वरुन प्रक्षेपित केले जातात. त्यामुळे केवळ रेडिओ नव्हे तर ऑनलाईन गुरू म्हणूनही या माध्यमास संबोधले तर हरकत नसावी.वाचकांनी http://radiomadhuban.in या संकेतस्थळावर अवश्य भेट द्यावी. यासंबंधी अधिक माहिती अथवा आपल्या प्रतिक्रिया info@bkvarta.com या ईमेलवर पाठवाव्यात.

*(पुढील अंकात - पीस ऑफ माईण्ड टीव्ही चॅनल विषयी सविस्तर माहिती अवश्य वाचा.)*



**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**
www.bkvarta.com